महाराष्ट्र शासन
सक्षम प्राधिकारी तथा उप सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

४७२

क्रमांक:- अशैसं-२०१६/प्र.क्र.२५३/का-५, दिनांक :- १४.१०.२०१६

## अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र

द साऊथ इंडियन एज्युकेशन सोसायटी, के. ए. सुब्रमन्यम रोड, मांटूंगा, मुंबई-१९ या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस **भाषिक ( तमिळ )** अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.११.०७.२०१६ रोजी अर्ज सादर केला होता. दि. १४.१०.२०१६ रोजी माझ्या समक्ष संबंधित संस्थेसोबत झालेल्या सुनावणी दरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सादरी करणाच्या आधारे सदर संस्था ही अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक: अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/का-५, दिनांक २७.०५.२०१३ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या संस्थेस भाषिक ( तमिळ ) अल्पसंख्याकामधील व्यक्तीकडून अथवा व्यक्तींच्या समुदायाकडून स्थापित व संचलित करण्यात येत असल्याबाबत माझे समाधान झाले आहे. परिणामत: सदर संस्था ही भारतीय संविधानाच्या कलम ३० अन्वये अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला संस्थेस **भाषिक ( तमिळ )** अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचलित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला संस्थेस **भाषिक ( तमिळ )** अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक: अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/का-५, दि.२७.०५.२०१३ अन्वये विहीत करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील.

अल्पसंख्याक विकास विभाग महाराष्ट्र शासन

14/x/2016

( सं. छ. तडवी )
सक्षम प्राधिकारी तथा उप सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग,महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

True Copy

Principal
SIES College of Arts, Science & Commerce (Autonomous)
Sion (West), Mumbai - 400 022

SIES COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE (AUTONOMOUS) MUMBAI 400 022

**Government of Maharashtra**

**Minority Development Department**

**Mantralaya, Mumbai- 400032**

No: अशैसं - २०१६/ प्र .क्र.२५३/का-५

Date: 14.10.2016

## Minority Certificate

The South Indian Education Society, K.A. Subramaniam Road, Matunga, Mumbai -19, an educational institution in an application dated 11.7.2016 had applied for a linguistic minority status recognition certificate.

In a hearing that occurred in my presence on 14.10.2016 where the office bearers of the institution presented that their institution was established and administered by individuals belonging to the Tamil minority (Tamil) linguistic status as per the criteria mentioned in the GR of Minority Development Department, No. अशैसं २०१२/ प्र. क्र. २१/का -५ dated 27.5.2013. Consequently, the concerned institution is being declared as a minority institution under Article 30 of the Indian Constitution.

This certificate is valid only for the state of Maharashtra. The linguistic minority status (Tamil) would be applicable to all the branches administered and managed by the institution.

The minority status of the above-mentioned institution would be considered legal (legitimate) from the academic year 2016-17. The concerned institution should consistently follow the criteria and conditions mentioned in the GR of Minority Development Department, No. अशैसं २०१२/ प्र. क्र. २१/का -५ dated 27.5.2013.

-/Sd

S.C. Tadavi

Competent Authority and Under Secretary

Minority Development Department, Government of Maharashtra,

Mantralaya, Mumbai - 400032

True Copy

Principal

SIES College of Arts, Science & Commerce (Autonomous)

Sion (West), Mumbai - 400 022.

SIES COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE (AUTONOMOUS) MUMBAI 400 022

# महाराष्ट्र शासन

क्र: अशैसं-२०२१/प्र.क्र.४१/का-५
अल्पसंख्याक विकास विभाग,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम
कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ०३२.
दिनांक:-२३ /०२/२०२१

प्रति,

सचिव,
साऊथ इंडियन एज्युकेशन सोसायटी,
एस.आय.ई.एस. चौक, के.ए. सुब्रमन्यम रोड,
माटुंगा, मुंबई-१९

**विषय:**-साऊथ इंडियन एज्युकेशन सोसायटी, मुंबई या शैक्षणिक संस्थेस प्रदान करण्यात आलेल्या अल्पसंख्याक दर्जाबाबत.

**संदर्भ:**- आपले पत्र, दि.२२.०१.२०२१

**महोदय,**

उपरोक्त विषयावरील आपल्या संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, राज्यातील अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना धार्मिक/ भाषिक अल्पसंख्याक दार्जा प्रदान करण्यासाठी शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, दि.२७.०५.२०१३ अन्वये अटी व शर्ती विहित करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयामधील अटी व शर्तींच्या अधिन राहून साऊथ इंडियन एज्युकेशन सोसायटी, मुंबई या शैक्षणिक संस्थेस क्र.अशैसं-२०१६/प्र.क्र.२५३/का.५, दि.१४.१०.२०१६ अन्वये भाषिक (तमिळ) अल्पसंख्याक दर्जा प्रदान करण्यात आला आहे. सदरहू संस्थेस प्रदान करण्यात आलेला अल्पसंख्याक दर्जा हा संस्थेने सुरू केलेल्या सर्व शाळा/ महाविद्यालये यांना लागू आहे.

२. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३० (१) अनुसार धार्मिक/ भाषिक अल्पसंख्याकांना शैक्षणिक संस्था स्थापन करुन चालविण्याचा मूलभूत अधिकार आहे. मा. सर्वोच्च न्यायालय तसेच मा. उच्च न्यायालयांनी अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था संदर्भात दिलेल्या विविध न्याय निवाड्यानुसार अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांमध्ये प्रचलित आरक्षण विषयक धोरण लागू होत नाही. साऊथ इंडियन एज्युकेशन सोसायटी, मुंबई ही शैक्षणिक संस्था अल्पसंख्याक असल्याचे मुंबई विद्यापिठाने त्यांच्या दि.२५.०८.१९८८ च्या पत्राद्वारे मान्य केले होते. तसेच उक्त संस्थेचे स्वरुप स्थापन झाल्यापासून भाषिक (तमिळ) अल्पसंख्याक असल्याने या विभागामार्फत सदर संस्थेस भाषिक (तमिळ) अल्पसंख्याक दर्जा प्रदान करण्यात आला आहे. त्यामुळे सदरहू संस्थेने दि.२५.०८.१९८८ ते दि.१४.१०.२०१६ या कालावधी मध्ये केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी भरतीस प्रचलित आरक्षण विषय धोरण लागू होत नाही.

आपला,

(सं.छ. तडवी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन
सहसचिव
अल्पसंख्याक विकास विभाग

SIES COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE (AUTONOMOUS)
MUMBAI
400 022
पत्र 2020

True Copy

Principal
SIES College of Arts, Science & Commerce (Autonomous)
Sion (West), Mumbai - 400 022.

**Government of Maharashtra**

No. अशैसं -२०२१/ प्र .क्र . ४१/का-५

Minority Development Department,

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg,

Mantralaya, Mumbai-400032

Date: 23/02/2021

To,

The Secretary,

South Indian Education Society,

SIES Chowk, K.A. Subramaniam Road,

Matunga, Mumbai- 19

**Subject**: Regarding the minority status of the South Indian Education Society, Mumbai

**Reference**: Your letter dated 22.1.2021

Sir,

This is with reference to your letter regarding the above-mentioned subject, you are informed that the Government Resolution (GR) of Minority Development Department dated 27.5.2013 has prescribed certain conditions and criteria for providing religious/ linguistic status to minority educational institutions in the state of Maharashtra. The South Indian Education Society, Mumbai has been granted linguistic (Tamil) minority status as per the conditions and criteria laid down in the GR No. अशैसं -२०२१/ प्र .क्र . ४१/का-५ dated 14.10.2016. The minority status is applicable to all the schools/ colleges established and administered by the institution.

Article 30(1) of the Indian Constitution provides religious and linguistic minorities the right to establish and administer educational institutions. As per various judgements and decisions of the Hon. Supreme Court as well as the High Court, the prevailing policy of reservations is not operational in minority educational institutions. The educational institution, South Indian Education Society, Mumbai has been accepted as a minority educational institution by the University of Mumbai through their letter dated 25.8.1988. The concerned institution is a linguistic (Tamil) minority institution since its establishment. Thus, the reservation policy is not applicable to the recruitments of teaching and non-teaching staff done by this institution in the period between 25.8.1988 to 14.10.2016.

-/Sd

S.C. Tadavi

Additional Secretary,

Minority Development Department

Government of Maharashtra

True Copy

Principal
SIES College of Arts, Science &
Commerce (Autonomous)
Sion (West), Mumbai - 400 022.

SIES COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE (AUTONOMOUS) MUMBAI 400 022